

# मृग बाग केळी लागवडीचे नियोजन





**कल्याणसिंग पाटील**
केळी विशेषज्ञ
जैन इरिगेशन सिस्टिम्स लि., जळगाव
मो. ९४२२७७४९४१

महाराष्ट्रातील केळी पिकाला आणि विशेषत: कान्हदेशच्या जळगाव जिल्ह्यातील केळी पिकाला शंभर वर्षाहून अधिक इतिहास आहे. तापी नदीच्या काठी जमा होणाऱ्या सुपीक गाळाच्या जमिनीत केळीचे पिक अत्यंत उत्कृष्ट येत असे. त्यामुळे केळी पिक पूर्वीपासूनच येथे घेतले जात होते. त्यात आणखीच भर पडली जैन इरिगेशन कंपनीने जे केळी पिकाचे तंत्रज्ञान विकसीत केले व ठिबक सिंचन आणि द्रवरूप खतांची त्याला जोड दिली त्यामुळेच. परिणामी केळीचे निव्वळ उत्पादनच वाढले असे नाही तर उत्पादकता आणि गुणवत्ता यात प्रचंड लक्षणीय बदल घडून आला. टिश्यूकल्चरमुळे अत्यंत दर्जेदार केळी बनू लागली. शिवाय भावही चांगले मिळू लागले. त्यामुळे सध्या शेतकऱ्यांचा मृगबाग केळी लागवडीकडे मोठा ओढा आहे. ही केळी उन्हाळ्यात कापायला येतील तेव्हा भाव चांगला असतो हे यावर्षीच्या अनुभवातून शेतकऱ्यांच्या लक्षात आले आहे.

केळीसाठी मागील वर्ष तसे चांगले गेले. गुणवत्तेच्या केळीला मार्च २०१७ मध्ये उच्चांकी २१५० रुपये क्विंटलचा भाव मिळाला. मागील वर्षी पाऊस कमी झाला. हिवाळा मार्च अखेर पर्यंत राहिला आणि एप्रिल अतिशय उष्ण गेला. अशा वातावरणाचा केळी पिकावर अतिशय मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम झाला. बागांची निसवण लांबली. अति थंडी आणि अति उष्णता या मुळे घडाच्या गुणवत्तेवर, केळीच्या वाध्यावर परिणाम दिसला. असे असतांनाही केळी उत्पादक उत्साहात कामाला लागले आहेत. कारण मागील वर्षापेक्षा हे वर्ष चांगले गेले आहे. जैन इरिगेशनने आपल्या स्वत:च्या ब्रँडने केळी निर्यातीला सुरुवात केली आहे. तर इतर अजुन चार ते पाच कंपन्या केळी निर्यात करीत आहेत. आणि गुणवत्तेच्या केळीला प्रिमीयम भाव देत आहे. पुढील वर्ष सुद्धा केळी साठी चांगले राहिल असा अंदाज आहे. परंतु सर्वसामान्य शेतक-यांच्या सुद्धा केळी बागांची गुणवत्ता सुधारणे महत्वाचे आहे. त्यासाठी केळी लागवडीतील प्राथमिक गोष्टी समजून तयारी करणे महत्वाचे आहे.

## जमिनीचे नियोजन

- केळीची लागवड कापूस, सोयाबीन किंवा पपईच्या शेतामध्ये करावी. मक्याच्या शेतात लागवड करणे टाळावे.
- सर्व प्रथम जमीन ६० एच.पी. च्या ट्रॅक्टरच्या सहाय्याने १२-१४ इंच खोल, आडवी-उभी नांगरावी.
- त्यानंतर रोटावेटर करुन जमीन भुसभुशीत करावी.
- एक हजार केळी साठी ४-५ ट्रॉली शेणखत घालावे.
- प्रति हजारी एक टन जिप्सम जमिनीत मिसळावे.
- काळ्या मातीच्या किंवा कमी निच-याच्या जमिनीमध्ये गादीवाफा तयार करावा.
- गादीवाफ्यावर प्रति हजारी ३ बॅग सुपर फॉस्फेट घालावे. ५० किलो पोटॅश, हजारी ५ बॅग निंबोळा पेंड व गांडूळखत घालावे.
- बेड पुन्हा रोटावेटर करुन सर्व मटेरियल चांगले मिसळून पुन्हा व्यवस्थीत करावा.
- बेडवर ४० सें.मी. वर २ लि. ताशी प्रवाहाची किंवा ४ ली. ताशी प्रवाहाची जैन एक्युरा इनलाईन किंवा जैन टर्बोलाईन एका ओळीसाठी एक किंवा एका ओळीसाठी दोन लॅटरल टाकून घ्याव्यात.
- बेड ओला करावा आणी मे मध्ये किंवा जुन च्या पहिल्या आठवड्यात लागवड करायची झाल्यास रोपे लागवडीच्या अंतरानुसार खुणा करुन रोपांपासुन ९ ते १२ इंच अंतरावर पश्चिम व दक्षिण बाजूने ताग पेरुन घ्यावा. ताग १२ ते १५ इंच झाल्यावर तागाच्या सावलीत लागवड करा.



- जुन अखेर, जुलै आणि ऑगस्ट लागवडीसाठी ताग पेरायची गरज नाही.
- बागेत पाणी साचू नये म्हणून ड्रेनेज चर काढा आणि जमीन वाहून जाऊ नये म्हणून बांध बंधीस्ती करा.

### जमिनीचा निचरा

केळी हे बारमाही ओलीतांचे पिक आहे. केळीच्या मुळा मासल असुन पांढ-या मुळ्या ह्याच कार्यक्षम मुळ्या आहेत व त्यामध्ये ९५ टक्के पाणी व ५ टक्के बायोमास आहे. ह्या मुळांचा आम्ही कधी विचार केला का ? मला केळी बागायतदार विचारतात रास कमी झाली, वाधा लहान झाला, प्रमुख कारण जमिनीचं पाट बांधल्या गेलं. क्षार जमा झाले, निचरा पूर्णपणे कमी झाला, मुळांचा विकास थांबला. जमिनीतील हवेचे प्रमाण कमी झाले.

म्हणून गरज आहे ती जमिनीचा निचरा वाढविण्याची. जगाच्या पाठीवर कुठल्याही देशात काळ्या जमिनीत किंवा क्षारपड जमिनीत केळी घेतली जात नाही. निचरा वाढविण्यासाठी जमीन जेसीबीने किंवा सबसॉईलरने २ ते २.५ फुट खोदावी.बागेतून पाणी बाहेर जाण्यासाठी चर काढावे. सबसरफेस ड्रेनेजचे पाईप टाकावे. हिरवळीचे खत घालावे व काळ्या जमिनीमध्ये लागवड ही गादी वाफ्यावरच करावी. जेणेकरुन मुळांच्या कक्षेत पाणी थांबणार नाही व सतत वाफसा स्थिती राहिल. तरच आपण इथून पुढे गुणवत्ता सांभाळू शकू.

## मल्चींगचा वापर करणे

गादीवाफा तयार करुन त्यावर मल्चींगचा प्लॅस्टीक कागद अंथरावा. त्यावर ठराविक अंतरावर छिद्रे करावे व रोपांची लागवड करावी किंवा रोपे लावून मल्चींग टाकावे. कारण त्यामुळे मुळांच्या कक्षेत उबदार वातावरण राहते. त्यामुळे १५ से.मी. मध्ये कार्यान्वीत असलेल्या मुळांची जोपासना होते. पावसाच्या पाण्याने दलदल






निर्माण होत नाही. थंडीपासून मुळांचे संरक्षण होते व उन्हाळ्यात पाण्याचे बाष्पीभवन होवून मुळांची कक्षा कोरडी होत नाही. पाणी व खते ठिबक सिंचनातुनच दिली जातात, त्यामुळे उत्पादकता व गुणवत्तेत मोठी वाढ होते.

## रोपांची हाताळणी आणि लागवड

- रोपांची गाडी शेतावर आल्यावर रोपे काळजीपूर्वक उतरवावी.
- वातावरण पोषक असल्यास रोपे त्वरीत लागवड करावी.
- उष्ण वातावरणात रोपांची लागवड तागाच्या सावलीत करावी.
- वातावरण पोषक नसल्यास रोपे उतरवून त्यावर खालील फवारणी करावी.

१) स्ट्रेप्टोसायक्लीन किंवा बॅक्टेरीमायसीन – १० ग्रॅम
कॉपर ऑक्सी क्लोराईड – ३० ग्रॅम
क्लोरोपायरीफॉस – ३० मिली
स्टिकर – २० मिली
(१५ लिटर पाण्यात)

२) १९:१९:१९ – २० ग्रॅम
सुक्ष्म अन्नद्रव्य – २०मीली
प्लॅन्टोझाईम – २० मिली
स्टिकर – २० मिली
(१५ लिटर पाण्यात)

३) केओलीन किंवा ग्रिन मॅरॅकल – ५०–७० ग्रॅम / मि.ली. / १५ लिटर पाण्यात घेवून रोपांवर फवारणी केल्यास उष्णतेचा शॉक कमी बसतो

४) रोपे लागवडीनंतर त्वरीत ठिबक संच चालवून मुबलक पाणी द्यावे. रोपे लागवडीनंतर सेट झाल्यानंतर गरजेनुसार पाणी द्यावे.

राप लागवडीनंतर एक आठवड्याने कंपनीच्या शिफारसी प्रमाणे फर्टीगेशन सुरु करावे.

युरीया – ४.५ के.जी.
+ १२:६१:० – २ कि.ग्रा.
+ पांढरे पोटॅश – ६ कि.ग्रा.
+ मॅग्नेशियम – ५०० ग्रॅम
(प्रति हजारी दर चौथ्या दिवशी असे लागवडीपासून २ महिने)

५) त्यानंतर शिफारशीप्रमाणे बदल करुन फर्टीगेशन करावे.